# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:04.09.2024** **वारःबुधवार**

---

1.महाराष्ट्र विधान परिषदेनं जबाबदार वरिष्ठ सभागृहाची भूमिका यशस्वीपणे बजावल्याचे राष्ट्रपतीं द्रौपदी मुर्मू यांचे गौरवोद्गार
2.शैक्षणिक संस्थांनी मुलींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करावं – राष्ट्रपतींचं आवाहन
3.भारत-ब्रुनेई दरम्यान आज द्विपक्षीय चर्चा, अनेक करार होण्याची शक्यता
4.नागालँडमधल्या वोखा जिल्हा प्रशासनाला ई गव्हर्नन्ससाठीचा सुवर्ण पुरस्कार
आणि
5.पॅरीस पॅरालिंपिक्स स्पर्धेत काल भारताला मिळाली ५ पदकं

महाराष्ट्र विधान परिषदेनं विविध महत्वपूर्ण निर्णय, कायदे करण्याबरोबरच लोकांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्याचं काम केलं आहे; एका जबाबदार वरिष्ठ सभागृहाची भूमिका यशस्वीपणे बजावत, देशाच्या संसदीय प्रणालीत महाराष्ट्र विधीमंडळाने स्वतःची ओळख निर्माण केली आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रपतीं द्रौपदी मुर्मू यांनी काढले. महाराष्ट्र विधान परिषदेच्या शताब्दी सोहळ्याला संबोधित करताना त्या काल मुंबईत बोलत होत्या. राष्ट्रपतींनी आपल्या भाषणाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करून केली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.
वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व; या ग्रंथाचं प्रकाशनही यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. तसंच 'उत्कृष्ट संसदपटू' आणि ' उत्कृष्ट भाषण' पुरस्कारांचं वितरणही त्यांच्या हस्ते करण्यात आलं. महाराष्ट्र विधान परिषदेचं राज्याच्या विकास कार्यात मोठं योगदान असल्याचं यावेळी राज्यपाल सी पी राधाकृष्णन म्हणाले. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या भाषणातून विधिमंडळाच्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख केला.
तत्पूर्वी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल दादर इथल्या चैत्यभूमीला भेट देऊन डॉ.
बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**राष्ट्रपती पुणे**

सर्व शैक्षणिक संस्थांनी मुलींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करावं असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल पुण्यात केलं. सिम्बायोसिस विद्यापीठाच्या २१व्या दीक्षांत समारंभात त्या बोलत होत्या. ज्ञानामध्ये जगात सकारात्मक बदल घडवण्याची क्षमता असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी समाजातील विविध घटकांच्या गरजा समजून घेऊन विकासात योगदान द्यावं, स्वतःच्या पुढे जाऊन समाजाचा विचार करावा असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं. दीक्षांत समारंभात 11 सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांपैकी 8 मुली होत्या याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. लैंगिक समानतेवर भर देऊन सर्वसमावेशक विकासासाठी विद्यापीठ करत असलेल्या प्रयत्नांचं त्यांनी कौतुक केलं. यावेळी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मंत्री चंद्रकांत पाटील आणि विद्यापीठाचे कुलपती शां. ब. मुजुमदार उपस्थित होते. या विद्यापीठात शिकत असलेल्या 85 देशांच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रपतींना आपल्या देशांचे ध्वज सादर केले.
राष्ट्रपती आज लातूर आणि नांदेड जिल्ह्याला भेट देणार असून उदगीर इथं बुद्ध विहाराचं लोकार्पण राष्ट्रपतींच्या हस्ते होणार आहे. तसंच संध्याकाळी नांदेडच्या तख्त श्री सचखंड हुजूर साहिब गुरुद्वारा इथं त्या दर्शन घेणार आहेत.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ब्रुनेईचे सुलतान हाजी हसनल बोल्किया यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. यावेळी द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंसोबतच सहाकार्याच्या नव्या क्षेत्रांबाबतही चर्चा होणं अपेक्षितच आहे. चर्चेनंतर दोन्ही देशांदरम्यान अनेक सामंजस्य करार होण्याची शक्यता आहे.

काल पंतप्रधान मोदींचं ब्रुनेईमध्ये पोहोचल्यावर समारंभपूर्वक स्वागत करण्यात आलं.

दोन्ही देशांमध्ये गेल्या 40 वर्षांपासून व्यापार, उर्जा, अंतराळ तंत्रज्ञान, आरोग्य यासह संरक्षण क्षेत्रात परस्पर सहकार्य केलं जात आहे. संरक्षण क्षेत्रातल्या सहकार्यासाठी एक संयुक्त कार्यकारी गट स्थापन करण्यासाठी दोन्ही देश प्रयत्नशील आहेत.

ब्रुनेईचा दौरा आटोपल्यानंतर पंतप्रधान सिंगापूरला भेट देणार आहेत. सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वाँग यांच्याशी ते दोन्ही देशांतल्या धोरणात्मक भागीदारीविषयी चर्चा करतील तसंच क्षेत्रीय आणि जागतिक मुद्द्यांवर विचारांचं आदानप्रदान करतील.

**ई-कारभार**

नागालँडमधल्या वोखा जिल्हा प्रशासनानं सुरू केलेल्या वोखा साथी या व्हॉटसऍप उपक्रमाला राष्ट्रीय इ गव्हर्नन्स योजना पुरस्कारांमधला सुवर्ण पुरस्कार मिळाला आहे. ई गव्हर्नन्ससाठी नागालँड सरकारला पहिल्यांदाच सुवर्ण पुरस्कार मिळाला आहे.

वोखा साथी हा कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित उपक्रम असून नागरिकांना वेळेत मदत मिळावी यासाठी तो सुरू करण्यात आला आहे. याद्वारे वोखा जिल्हा प्रशासनाच्या ४० पेक्षा जास्त सेवांचा लाभ नागरिकांना व्हॉटसऍप मंचावर मिळणार आहे. तसंच नागरिक आणि प्रशासन यांच्यातल्या संवादामधून कुठल्याही वेळी अत्यावश्यक माहिती आणि सेवा मिळवणंही सुलभ झालं आहे. 27व्या राष्ट्रीय इ-गव्हरनन्स परिषदेला काल मुंबईत सुरुवात झाली. यावेळी झालेल्या पुरस्कार सोहोळ्यात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**जागतिकबँक**

आव्हानात्मक बाह्य परिस्थितीतही पहिल्या सहामाहीत भारताची अर्थव्यवस्थेतली वाढ सकारात्मकच असेल असं जागतिक बँकेनं म्हटलं आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीत भारताला असलेल्या व्यापारी संधींबाबतच्या जागतिक बँकेच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या अहवालात हे नमूद करण्यात आलं आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारताचा विकास दर ७ टक्के राहील आणि त्यानंतरची दोन वर्षदेखील तो ७ टक्क्यांच्या आसपास असेल असा अंदाज जागतिक बँकेनं व्यक्त केला आहे.

स्वित्झर्लंडदूतावास

स्वित्झर्लंडनं इराकमध्ये ३३ वर्षांनंतर पुन्हा आपला दूतावास सुरू केला आहे. १९९१ मध्ये आखाती युद्धाच्या वेळी हा दूतावास बंद करण्यात आला होता. इराक आणि स्वित्झर्लंडमधले द्विपक्षीय संबंध मजबूत करण्याच्या प्रयत्नांचा हा भाग असून विवध क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्य वाढवण्याची दोन्ही देशांची इच्छा यातून दिसून येते असं इराकच्या परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. तर इराकमधली सुधारलेली सुरक्षाव्यवस्था हे दूतावास पुन्हा सुरू करण्याचं प्रमुख कारण असल्याचं स्वित्झर्लंडच्या परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

**इंदूर**

नव्यानं मंजूरी मिळालेल्या मुंबई इंदूर रेल्वेमार्गामुळे देशाच्या मध्य भाग, पश्चिम भाग तसंच नैऋत्य भाग यांच्यातलं दळणवळण वेगानं होईल असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. यामुळे पर्यटनाला विशेषतः उज्जैनमधल्या श्री महांकालेश्वर ज्योतिर्लिंग देवस्थानाठिकाणच्या पर्यटनाला प्रोत्साहन मिळेल असं वैष्णव म्हणाले.

या नवीन मार्गामुळे महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातली सुमारे एक हजार गावं एकमेकांशी जोडली जाणार आहेत.

**दूरसंचारविभाग**

देशातील सर्व अनोंदणीकृत यांत्रिक तसंच बिनतारी सेवा पुरवणाऱ्या सर्व आस्थापनांनी या महिनाअखेरपर्यन्त नोंदणी करावी असे निर्देश केंद्रीय दूरसंचार विभागाने दिले आहेत. नोंदणी न केल्यास सेवा खंडित करण्यात येतील तसंच उपकरणे परत घेतली जातील असा इशाराही विभागाने दिला आहे. सरल संचार पोर्टल तसंच ऑनलाइन माध्यमातून याबाबतची नोंदणी करता येणार आहे.

**भारत-UAEकॅग**

भारताचे महालेखापाल गिरीश चंद्र मुर्मू आणि  संयुक्त अरब अमिरातीच्या उत्तरदायित्व प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्यात काल द्विपक्षीय बैठक झाली. या बैठकीदरम्यान उभय अधिकाऱ्यांनी एका  सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. हा सामंजस्य करार आमच्या संस्थांच्या सामायिक मूल्ये आणि उद्दिष्टांचा पुरावा आहे आणि भारत आणि यूएई यांच्यातील मजबूत संबंधांना बळकटी देतो. तसंच, या करारामुळे सर्वोच्च लेखापरीक्षा संस्थांमध्ये अधिक सहकार्य आणि शिकण्याची संधी निर्माण होईल असं गिरीश चंद्र मुर्मू याप्रसंगी बोलताना म्हणाले.

**पॅरालिम्पिक**

पॅरिस इथे सुरू असलेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी काल पदकतालिकेत पाच पदकांची भर टाकली. महिलांच्या ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत दीप्ती जीवनजी हिने कास्य पदक पटकावलं तर पुरुषांच्या उंच उडी प्रकारात शरद कुमारने रौप्य आणि मरियप्पन थंगवेलू याने कास्य पदक पटकावलं. भालाफेकीत अजित सिंह आणि सुंदर गुर्जर यांनी अनुक्रमे रौप्य आणि कास्य पदकाची कमाई केली.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व पदकविजेत्या खेळाडूंचं दूरध्वनीवरुन अभिनंदन केलं. आपल्या खेळाडूंचा देशाला अभिमान असल्याचं त्यांनी समाजमाध्यमांवरील आपल्या अभिनंदनपर संदेशांत म्हटलं आहे.

**हवामान**

महाराष्ट्राच्या, विदर्भात वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. अन्यत्र हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

दरम्यान, आंध्र प्रदेशात पुन्हा जोरदार पाऊस पडल्यामुळे विजयवाडा आणि गुंटूर भाग पुन्हा जलमय झाला आहे. याचा तिथल्या मदतकार्यावर विपरित परिणाम झाला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.